“लघुउद्योगांच्या वित्तीय व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. पूर्व पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

विनयकुमार विष्णूप्रसादजी मालपाणी

B.Com., M.Com., DTL, GDC & A.

संशोधन मार्गदर्शक

डॉ. अतिश उ. राठोड

M.Com., B.ED. G.D.C. & A., Ph.D.
Assistant Professor and Head of Accounts & Statistics
Faculty of Commerce, N.S.B. College, Nanded
Research Guide. S.R.T.M. University, Nanded

सप्टेंबर : २०२२

प्रस्तावना

औद्योगिक व्यवसायाचे स्थूलमानाने मोठे उद्योग, मध्यम उद्योग आणि लघुउद्योग असे तीन भागात वर्गीकरण केले जाते. हे वर्गीकरण करताना गुंतविलेले भांडवल, एकूण रोजगार, उत्पादित मालाची किंमत इत्यादी बाबींचा विचार केला जातो. लघुउद्योगांची व्याख्या अनेकदा बदलली आहे. दुसऱ्या महायुद्धपूर्वी ३०,००० रू. भांडवल गुंतविलेल्या कारख्यान्यास लघुद्योग म्हटले जात होते. पंचवार्षिक योजनांच्या प्रारंभी भारत सरकारक्ष्या लघुद्योग मंडळाने पाच लाख रूपयांहून कमी भांडवली गुंतवणूक असलेला व यंत्रशक्ती वापरात असल्यास ५० पेक्षा कमी कामगार असलेला कारखाना अशी लघुउद्योगाची व्याख्या केली होती. पुढे भांडवल व कामगार या दोन कसोट्यांचीच कसोटी लावण्याचा निर्णय घेतला गेला. कालांतराने सतत होत जाणारी भाववाढ लक्षात घेऊन भांडवलाची कमाल मर्यादा वेळोवेळी वाढविण्यात आली. तसेच लघुउद्योगात एक लाख रूपयांहून कमी गुंतवणूक असलेल्या एकांचे अतिलघू असे वर्गीरण करण्यात आले. तसेच १९८० साली जाहीर केलेल्या व नंतर सुधारलेल्या भारत सरकारच्या धोरणाप्रमाणे लघुद्योगांचे प्रचलित वर्गीकरण असे आहे. एक यंत्रे व कारखाना यांमध्ये दोन लाख रूपये हून कमी गुंतवणूक असलेल्या व ५०,००० हून कमी लोकवस्तीच्या गावी असलेल्या एककांचा अतिलघू विभाग, दोन ३५ लाख रूपयांहून कमी गुंतवणूक असलेल्यांचा लघुविभाग आणि तीन अंगभूत उद्योग असल्यास ४५ लाख रूपयांहून कमी गुंतवणुकीच्या उद्योगांचा अंगभूत विभाग. जे उद्योग इतर उत्पादन एककांना यंत्राचे घटक भाग, त्यांच्या उत्पादनासाठी उपजुळवण्या, हत्यारे वा अर्धपक्व माल व त्यांच्या सेवेच्या वा उत्पादनाच्या ५० टक्के मूल्यापर्यंत माल वा सेवा पुरवितात, त्यांचा समावेश अंगभूत उद्योगांत करण्यात आला.

लघुउद्योगाच्या उत्पादनात विविधता दिसून येते. यामध्ये उपभोग्य वस्तू, अर्धपक्व माल, लहान यंत्रे, हत्यारे व अवजारे, मोठ्या यंत्रांचे भाग, त्यांच्यासाठी विविध भागांच्या उपजुळवण्या असे सर्व प्रकारचे उत्पादन हे उद्योग करू शकतात. यामुळे विकसित देशांतही लघुउद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे. उदा. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत एकूण कामगारांपैकी साधारणपणे ४५ टक्के कामगार लघुउद्योगांत असून एकूण उत्पादनापैकी ३४ टक्के उत्पादनाचा वाटा लघुउद्योगांचा असतो. ग्रेट ब्रिटनमध्ये एकंदर कामागारांपैकी २९ टके कामगार ५ ते ३० कामगार असलेल्या कारखान्यांत आहेत व अशा कारखान्यांचे उत्पादन एकूण उत्पादनाच्या १९ टक्के आहे. तर जपानमध्ये एकूण कामगारांच्या ५० टक्के कामगार हे लघुउद्योगात आहेत.

भारतात केंद्र व राज्य शासनांनी कुटिरोद्योग व इतर सर्व प्रकारचे लघुउद्योग यांच्या विकासासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी निरनिराळ्या योजना आणल्या आहेत. व त्यांना सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत त्यांना एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. १९७९-८० साली केंद्रीय सांख्यिकी संघटन व राष्ट्रीय लेखा सांख्यिकी या संस्थांनी केलेल्या अंदाजांप्रमाणे वस्तुनिर्माण क्षेत्राच्या उत्पादनाच्या एकूण मूल्यात सर्व प्रकारच्या लघुउद्योगांचा वाटा ४९ टक्के होता तर एकूण उत्पादनापैकी ५१ टक्के उत्पादन होते. या उद्योगांनी जवळजवळ २.४ कोटी कामगारांना पूर्णवेळ वा अंशकालीन रोजगार पुरविला. याउलट मोठ्या किंवा मध्यम उद्योगांत ४५ लाख पूर्णवेळ काम करणारे कामगार होते. तसेच देशाच्या निर्यातीमध्ये या उद्योगांचा भाग ३३ टक्के होता. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात या उद्योगांचा सरासरी वार्षिक वृद्धिदर ६ टक्के होता तर मोठ्या व मध्यम उद्योगांचा ५.५ टक्के होता. आज भारतामध्ये बेकारीच्या समस्येने अतिशय गंभीर रूप धारण केले आहे. तर दुसऱ्या बाजूला वाढत्या लोकसंख्येमुळे

बेखारीत आणखीन भर पडत आहे. यावर मात करण्यासाठी लघुउद्योगाना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

संशोधन समस्या

वैज्ञानिक संशोधनात समस्या निर्धारण किंवा समस्यासूत्रण ही सामाजिक संशोधनाची प्रथम पायरी होय. सामाजिक समस्या अतिशय जटिल स्वरुपाच्या असतात. कारण समस्यांना अनेक पैलू असतात. त्यापैकी कोणत्या तरी एका पैलूची निवड संशोधन अध्यनासाठी करावी लागते. अशा प्रकारच्या संशोधनाच्या सामान्य विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रुपांतर करणे म्हणजे समस्यासूत्रण होय. संशोधन समस्या संशोधनकर्त्यास जाणवणारी एक सैध्दांतिक किंवा व्यावहारिक अडचण होय. साधारणतः समस्यासूत्रणात काही मूलभूत प्रश्नांचा विचार करणे आवश्यक असते. जसे कशाचा अभ्यास करावयाचा आहे? अभ्यासाचे क्षेत्र कोणते? आदी बाबीचा अभ्यास करणे यामध्ये अपेक्षित असते.

समकालीन स्थितीचा विचार करता देशात भरमसाठ प्रमाणात बेकारी वाढताना दिसून येत आहे. बेकारीचे प्रमाण पाहता ते १०.४ टक्क्यांवर पोहचले आहे. ज्या प्रमाणात देशात तरूणांची संख्या वाढत आहे त्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही. यांचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे खाऊजा धोरण आहे. वाढती बेकारी ही देशापुढे चिंतेची बाब असल्यामुळे कुटीर व लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे अतिशय आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून लघुउद्योगांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठीच **"लघुउद्योगांच्या वित्तीय व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"** हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

एकूणच देशाचा जलद गतीने आर्थिक विकास होण्यासाठी औद्योगिक क्षेत्राचा विकास करणे महत्त्वाचे असते. प्रामुख्याने उत्पादन व निर्माण उद्योगांकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे असते. औद्योगिक क्षेत्राचा विकास झाला तर वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारी बेरोजगारी आणि मागासलेपणा दुर होण्यास मदत होते. औद्योगिक क्षेत्राच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे, लघुउद्योगाचे स्थान मोठे आणि परिणामकारक आहे. कारण देशाच्या एकूण आर्थिक जीडीपीमध्ये लघुउद्योगांचे योगदान ३० ते ३५ टक्के आहे. विख्यात व्यवस्थापन सल्लागार संस्था केपीएमजी ने नुकत्याच प्रकाशित केलेल्या विशेष अहवालानुसार देशातील एकूण व्यापार, उदिमांमध्ये एमएसएमई चा वाटा ३६ टक्के, उत्पादन प्रक्रियेत ३१ टक्के तर इतर उद्योग व्यवहारात एमएसएमई चे प्रमाण ३३ टक्के आहे. यावरून लघुउद्योगाचे महत्त्व लक्षात येते. स्वातंत्र्यत्तोर भारतामध्ये १९४८ ते १९९१ पर्यंतच्या औद्योगिक धोरणामध्ये लघुउद्योगांकडे विशेष लक्ष देण्यात आले होते. परंतु १९९० नंतर खाऊजा धोरणामुळे कुटीर आणि लघुउद्योग मोडकळीस आले. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये भांडवलाच्या समस्या आणि मुबलक प्रमाणात नैसर्गिक साधनसामग्रीच्या उपलब्धतेमुळे औद्योगिक मागासलेपणा दूर करणे शक्य आहे. तसेच महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत असले तरी सर्व विभागांचा समतोल विकास झालेला नाही. त्यात मराठवाडा हा औद्योगिकदृष्ट्या मागास राहिला आहे. आणि त्यातल्या त्यात नांदेड जिल्ह्यात पाहिजे त्या प्रमाणात लघुउद्योगाचा विकास झालेला नाही, ही खेदाची बाब आहे. समकालीन स्थितीमध्ये लघुउद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनाच्या घटकांचा अभ्यास करून लघुउद्योगाची स्थिती काय आहे. हे पाहणे अभ्यासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. नांदेड जिल्ह्याच्या भौगोलिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. लघुउद्योगा संबंधी सरकारी धोरणे व योजनांचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांच्या कार्यपद्धीचा अभ्यास करणे.

४. लघुउद्योगांच्या भांडवल उभारणीच्या स्थितीचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांच्या वित्तीय व्यवस्थापनाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

६. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांपुढील समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सूचविणे.

संशोधनाची गृहीतके

१. नांदेड जिल्ह्याच्या भौगोलिक रचनेत अनेक घटक महत्त्वपूर्ण आहेत.

२. लघुउद्योगा संबंधी सरकारी धोरणे व योजनांची नव्याने बांधणी करणे गरजेचे आहे.

३. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांची कार्यपद्धीत सुरळीतपणा दिसून येत नाही.

४. लघुउद्योगांच्या भांडवल उभारणीत अनेक स्त्रोतांचा अवलंब करावा लागतो.

५. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांच्या वित्तीय व्यवस्थापनात सातत्य असल्याचे दिसून येत नाही.

६. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय." प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते.

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत सशोधन असे तीन प्रकार पडतात. व्याहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक आहे. क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन, स्त्रीवादांच्या समस्या यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्‌भवलेल्या समस्याचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल

घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थलकालपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय व्यावहारीक अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे सांख्यिकीय पद्धतीबरोबर विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधन विषयाचे उद्दिष्टे आणि दिलेले गृहीतके सिद्द करण्यासाठी नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला आहे. अभ्यास विषयाची निवड करताना शहरी क्षेत्राबरोबर ग्रामीण क्षेत्रात असलेल्या लघुउद्योगांच्या समस्येचा विचार करून वित्तीय व्यवस्थानाचा अभ्यास करण्याचे ठरविण्यात आले आहे. भारतातील सर्वच लघुउद्योगातील कार्यपद्धती सारखीच असल्यामुळे व माहिती संकलन खर्चाच्या दृष्टिकोनातून नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगाची निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्हा अधिनियम एम.एस.एम.ई ॲक्ट नुसार नव्याने वर्गीकरण करण्यात आलेले २०० लघुउद्योग आहेत. या लघुउद्योगांचा स्तरीय यादृच्छित नमुना पद्धतीने निवड अभियांत्रिकी उद्योग, कृषी व वन आधारित उद्योग, पेपर व छपाई उद्योग, कापड व लेदर उद्योग आणि इतर उद्योग अशा पाच विविध लघुउद्योग प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे.

तथ्य संकलन पद्धती

तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्राथमिक तथ्य संकलन	**द्वितीय तथ्य संकलन**
प्रत्यक्ष निरीक्षण	
प्रश्नावली	शासकीय अहवाल/प्रकाशने
मुलाखती	खाजगीसंस्थाचे अहवाल/प्रकाशने
अनुसूची	वर्तमानपत्रे/मासिके/पुस्तके
विशिष्टाभ्यास	ऐतिहासिक कागदपत्रे

सामुग्री संग्रहन पद्धतीमध्ये सर्वेक्षण पद्धती, निरीक्षण पद्धती आणि प्रत्यक्ष भेटून माहिती संकलन केले जाईल. प्रश्नावलीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक २ लघुउद्योगामागे १ नमुना या प्रमाणात २०० लघुउद्योगासाठी १०० नमुना निवड निश्चित केली आहे. दुय्यम माहिती संग्रहनाच्या पद्धतीमध्ये उलुउद्योग संदर्भातील प्रकाशित पुस्तके, जिल्हा उद्योग केंद्राचे माहिती पुस्तक, विविध लेखकाचे लघुउद्योग संदर्भातील पुस्तके, संशोधन लेखे, इंटरनेटद्वारे मासिक व वर्तमान पत्रे इत्यादी साधनांचा वापर केला जाईल.

संशोधनाची मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाला खालीलप्रमाणे मर्यादा घालण्यात आल्या आहेत.

१. नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करताना देश व महाराष्ट्राचाही थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.
२. संशोधन अभ्यासाचा कालावधी २०१०-११ ते २०२०-२१ असा दहा वर्षाचा आहे.
३. नांदेड जिल्ह्यातील निवडक लघुउद्योगातील पाच उद्योग प्रकारात विभागणी करताना फक्त नोंदणी केलेल्या लघुउद्योगांचा समावेश करण्यात आलेला आहे. बिगर नोंदणी केलेल्या उद्योगांचा यामध्ये समावेश नाही.

संशोधनाचा आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती

प्रकरण तिसरे : सरकारी धोरणे आणि विविध योजना

प्रकरण चौथे : नांदेड जिल्हा : एक दृष्टिक्षेप व लघुउद्योगांच्या व्यवस्थापकीय घटकाचे विश्लेषण

प्रकरण पाचवे : नांदेड जिल्ह्यातील लघुउद्योगांचे वित्तीय व्यवस्थपन

प्रकरण साहवे : निष्कर्ष आणि उपाययोजना

संदर्भग्रंथ

१. व्ही.बी.पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २०१२

२. ए.एन.भक्कड, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२

३. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती

४. पी.एल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, प्रथमावृत्ती १९९४

५. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१

६. प्रा.एस.डी.दराडे, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

७. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन,

८. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher.

९. www.wikipedia.org

१०. ए.एम. ओमेन, स्मॉल स्केल इंडस्ट्रीज इन केरळ, अ केस स्टडी द रोल ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज इन इकॉनॉमिक्स ग्रोथ, पीएच.डी. थिसिस ऑफ केरळा, १९६७

११.ए. एस. हामिद, मॅनेजमेंट अँन्ड डेव्हलपमेंट इन स्मॉल स्केल इंडस्ट्रिज, अनमोल प्रकाशन, न्यु, दिल्ली, १९४१

१२. एम. एन. खंडेवाल, वर्किंग कॅपिटल मॅनेजमेंट इन स्मॉल स्केल इंडस्ट्रिज, आशिष पब्लिशिंग, न्यु दिल्ली, १९८५
१३. बी. आर. चोयाला, फायनान्सीयल मॅनेजमेंट ऑफ स्टेट इंटरप्रायझेस प्रिंटवेल पब्लिशर्स, जयपुर, १९८६
१४. अशोक कुमार, एंटरप्रेनीअरशिप इन स्मॉल इंडस्ट्री, डिस्कव्हरी पब्लिकेशन, न्यु दिल्ली, १९९०

संशोधक विद्यार्थी
विनयकुमार वि. मालपाणी

संशोधन मार्गदर्शक
डॉ. अतिश उ. राठोड